दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■
•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २८९ •सोमवार,दि.१९ जानेवारी २०२६ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये
• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955




# राज्याच्या राजकारणात सर्वात मोठा भूकंप

## दोन्ही शिवसेना एकत्र येणार ? ३ बड्या नेत्यांच्या गुप्त भेटीने खळबळ!

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात महानगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. या निवडणुकीत २९ महापालिकांपैकी बहुसंख्य महापलिकांत भाजपा हा क्रमांक एक नंबरचा पक्ष ठरला आहे. आता राज्यभरात महापौरपदाच्या निवडीसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. एकीकडे महानगरपालिकेची निवडणूक संपलेली असताना आता दुसरीकडे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी वातावरण तापले आहेत. जिल्हा परिषद जिंकण्यासाठी आतापासूनच युती आणि आघाड्यांच्या राजकारणाने वेग पकडला आहे. असे असतानाच आता खळबळ उडवून देणारी माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार दोन्ही शिवसेना एकत्र येण्याची शक्यता आहे. नेमकी काय माहिती समोर आली?

मिळालेल्या माहितीनुसार दोन्ही शिवसेना एकत्र येण्याच्या हालचालींना वेग आला आहे.




### • भाजपाला एकटे पाडण्याच्या हालचाली सुरू

**दरम्यान आज (१८ जानेवारी) ५ वाजता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी या अनुषंगानेच धाराशिव येथे पदाधिकाऱ्यांची बोलावली बैठक बोलावली आहे. या बैठकीत ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांचे मत जाणून घेण्यात येणार आहे. एकंदरीतच आमदार तानाजी सावंत, खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांनी जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपाला एकटे पाडण्याच्या हालचाली सुरू केल्याचं चित्र धाराशीव जिल्ह्यात पाहायला मिळत आहे.**

जिल्हा परिषदेच्या निवडणूक जिंकण्यासाठी या एकत्रिकरणासाठी चर्चा चालू झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांनी पुण्यामध्ये शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार तानाजी सावंत यांची भेट घेतली आहे. या भेटीनंतर सोमवारी (१९ जानेवारी) दोन्ही शिवसेनेच्या नेत्यांची आणि पदाधिकाऱ्यांची धाराशीव येथे संयुक्त ▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये पोलीस व्हॅनच्या धडकेत जखमी झालेल्या अमोल हांडगे यांचा मृत्यू

### ज्ञानराधा बँकेच्या आरोपींना घेऊन जाणाऱ्या गाडीने दिली होती धडक

**बीड । प्रतिनिधी**

नेकनूर-येळंब महामार्गावर शनिवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेले ३५ वर्षीय तरुण शेतकरी अमोल हांडगे यांची मृत्यूशी झुंज अखेर अपयशी ठरली. आज रविवारी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. ज्ञानराधा मल्टीस्टेट बँक घोटाळ्यातील आरोपींना घेऊन जाणाऱ्या पोलीस वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत एका निष्पाप तरुणाचा जीव गेल्याने संपूर्ण बीड जिल्ह्यात आणि केज




तालुक्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

वाघेबाभळगाव (ता. केज) येथील रहिवासी असलेले अमोल हांडगे आणि विक्रम हांडगे (वय ३५) हे दोघे शेतकरी आपल्या कामानिमित्त नेकनूर येथे आले होते. काम आटपून सायंकाळच्या सुमारास ते दुचाकीवरून आपल्या गावाकडे परतत होते. याच दरम्यान, ज्ञानराधा मल्टीस्टेट बँक घोटाळ्यातील मुख्य आरोपी सुरेश कुटे आणि अर्चना कुटे यांना केज येथून बीडकडे घेऊन जाणारी पोलिसांची व्हॅन भरधाव वेगाने येत होती. ▶ उर्वरित पान २ वर

## बीडच्या GST अधिकाऱ्याच्या मृत्यूचं कोडं सुटलं

### कारमध्ये पत्र, पत्रात वरिष्ठ अधिकाऱ्याचं नाव अन्... परिसरात एकच खळबळ

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. गेल्या २४ तासांपासून बेपत्ता असलेल्या एका वरिष्ठ जीएसटी अधिकाऱ्याचा मृतदेह त्यांच्याच चारचाकी गाडीत संशयास्पद अवस्थेत आढळून आला आहे. या प्रकरणात आता एक मोठी माहिती समोर आली असून, या अधिकाऱ्याने आपल्या आयुष्याची अखेर केल्याची माहिती समोर आली आहे. हा टोकाचा निर्णय



घेण्यापूर्वी त्यांनी एक सुसाईड नोट लिहून ठेवली आहे, ज्यामध्ये आपल्या मृत्यूला वरिष्ठ अधिकारी जबाबदार असल्याचे नमूद केले आहे. या घटनेने बीडमध्ये एकच खळबळ माजली आहे.

सचिन नारायण जाधवर (वय ४५, रा. बीड) असे मृत पावलेल्या अधिकाऱ्याचे नाव असल्याची माहिती आहे. जाधवर हे वस्तू व सेवा कर विभागात महत्त्वाच्या पदावर कार्यरत होते. काल रात्री ते कामावरून घरी परतले नाहीत आणि त्यांचा फोनही लागत नसल्याने कुटुंबीयांनी सर्वत्र त्यांचा शोध घेतला. अखेर त्यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात जाधवर बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवली.

शनिवारी (१७ जानेवारी) दुपारी एक वाजेच्या सुमारास धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या ▶ उर्वरित पान २ वर

## फेब्रुवारीत होणार शिष्यवृत्ती परीक्षा, बीड सीईओंच्या संकल्पनेतून चाचपणी

**बीड । प्रतिनिधी**

यावर्षी शिष्यवृत्ती परीक्षेतील काठीण्य पातळी घटवून अभ्यासक्रमात काही प्रमाणात बदल केला आहे. हा बदल लक्षात घेता जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना यामध्ये अधिकाधिक यश मिळावे यासाठी खुद्द सीईओंनी लक्ष घातले आहे. फेब्रुवारी महिन्यात होत असलेल्या परीक्षेपूर्वी ४ सराव चाचण्या होणार आहेत. यातील पहिली चाचणी ५ हजार विद्यार्थ्यांनी दिली. परीक्षेची भीती कमी करणे, वेळेचे नियोजन अन् प्रश्नांतील शॉर्टकर्ट कळावेत हा उद्देश यामागे ठेवण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेची पहिली सराव चाचणी पार पडली. चाचणी सुरळीत झाली. बीड तालुक्यातील चंपावती प्राथमिक विद्यालय येथे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी भेट दिली. पूर्व माध्यमिक पाचवीसाठी ४ हजार ५४५ विद्याथ्यर्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३ हजार ९२१ विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थिती ८६.२७ टक्के होती. आठवीसाठी १ हजार २१४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १ हजार १७ विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थिती ८३.७७टक्के होती. प्रश्नपत्रिका मराठी आणि उर्दू माध्यमासाठी तयार करण्यात आल्या. ओपन लिंक फाउंडेशन पुणे यांच्या विनोबा अॅपच्या माध्यमातून ओएमआर स्कॅनिंग करून उत्तरपत्रिका तपासल्या जातील. निकाल ५ दिवसांत जाहीर केला जाईल. ▶ उर्वरित पान २ वर

## जोरदार पावसाचा परिणाम; बीडमध्ये पाणीसाठा 83 टक्क्यांवर

**बीड । प्रतिनिधी**

यंदा झालेल्या जोरदार पावसामुळे जिल्ह्यात समाधानकारक जलस्थिती निर्माण झाली आहे. १५ जानेवारी रोजीच्या अधिकृत अहवालानुसार, जिल्ह्यातील लहान-मोठ्या एकूण १६७ धरणांमध्ये ८३.८७ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या रब्बी हंगामासह पुढील उन्हाळ्याचे किमान चार महिने तरी जिल्ह्यात पाणीटंचाई जाणवणार नसल्याचा दिलासादायक अंदाज जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला आहे. यंदा कोणत्याही भागात टँकर सुरू करण्याची वेळ येणार नाही, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. बीड जिल्हा




हा कायमस्वरूपी पाणीटंचाईग्रस्त म्हणून ओळखला जातो. दरवर्षी उन्हाळ्यात अनेक गावांमध्ये टँकर सुरू होतात, हा आजवरचा अनुभव आहे. मात्र, यंदाचे वर्ष अपवाद ठरले आहे.

२०२५ च्या एप्रिल व मे महिन्यांत झालेल्या अवकाळी पावसामुळे त्या काळातच पाणीटंचाई मोठ्या प्रमाणावर टळली. त्यानंतर जून-जुलैमध्ये काही काळ पावसाने उघडीप दिली असली, तरी ऑगस्ट व सप्टेंबर अखेरपर्यंत जिल्ह्यात सर्वदूर मुसळधार पाऊस झाला.

विशेष म्हणजे, नेहमी कोरडा भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिरूर आणि आष्टी तालुक्यांतही जोरदार पाऊस झाल्याने काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या आणि पिकांचे नुकसान झाले.

मात्र, दुसरीकडे जिल्ह्यातील जवळपास सर्वच धरणे तुडुंब भरली. एकीकडे पीकनुकसान असले, तरी पाणीसाठ्याच्या दृष्टीने ही परिस्थिती जिल्ह्यासाठी दिलासादायक ठरली आहे.

सध्या जानेवारी महिना अर्ध्यावर आला असून, पुढील तीन ते चार ▶ उर्वरित पान २ वर

## खा. सोनवणे 'स्वाराती'चा घेणार आढावा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई (स्वाराती) येथे उपलब्ध रुग्णसेवा, आरोग्य सुविधा, मनुष्यबळ, औषध साठा, पायाभूत सुविधा तसेच विविध प्रलंबित प्रश्नांबाबत बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग सोनवणे हे सविस्तर आढावा घेणार आहेत. यासाठी सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. खा. बजरंग सोनवणे यांच्या पुढाकारातून ही बैठक आयोजित करण्यात येत असून, यासंदर्भात रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनास पत्राद्वारे आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. या बैठकीस सर्व संबंधित विभागप्रमुख, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी तसेच प्रशासनातील जबाबदार अधिकारी उपस्थित राहणार आहेत. ग्रामीण व दुर्गम भागातील ▶ उर्वरित पान २ वर




## उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या उपस्थितीत मा.आ. संगीताताई ठोंबरे यांचा शिवसेनेत प्रवेश



### केज मध्ये शिवसेनेच्या ताकदीला मिळाले बळ : सचिन मुळूक

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात वेगाने संघटन विस्तार करत असलेल्या शिवसेनेला केज विधानसभा मतदारसंघात मोठे राजकीय बळ मिळाले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या प्रमुख उपस्थितीत केजच्या माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष संगीताताई ठोंबरे व लोकनेते गोपीनाथराव मुंडे सहकारी सूतगिरणी, केजचे व्हा. चेअरमन डॉ. विजयप्रकाश ठोंबरे यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, चंद्रकांत नवले, तालुकाप्रमुख परळी व्यंकटेश शिंदे उपस्थित होते. माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांच्या सोबत सोबत विजय बापू केंद्रे (संस्थापक अध्यक्ष, संत भगवान बाबा युवा सेना), किशोरजी थोरात (मा. सरपंच, कुंबेफळ), अरविंद चाळक, अशोक सक्राते (मा. सरपंच, येवता) व उमेश चाळक यांनीही शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. ग्रामपंचायत स्तरापासून युवक संघटनांपर्यंत प्रभाव असलेले नेतृत्व एकाच वेळी पक्षात सामील झाल्याने केज मतदार संघात शिवसेनेला अधिक बळ मिळाले आहे असे जिल्हा प्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना ही केवळ सत्ताधारी पक्ष न राहता जनतेच्या प्रश्नांवर निर्णयक्षम नेतृत्व देणारी ताकद बनली असल्याचे या प्रवेशातून स्पष्ट होत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व विधानसभा राजकारणाच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश केज मतदारसंघासाठी निर्णायक ठरणार आहे.



# महाराणा प्रताप : लोककल्याणाच्या सामाजिक कार्याची अमर परंपरा

भारतीय इतिहासाच्या दीर्घ आणि समृद्ध परंपरेत काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांचे स्मरण केवळ त्यांच्या पराक्रमामुळे किंवा राजकीय संघर्षामुळे मर्यादित राहत नाही, तर त्यांच्या सामाजिक जाणिवा, लोककल्याणाची भूमिका आणि मूल्यनिष्ठ जीवनामुळे ती व्यक्तिमत्त्वे काळाच्या पलीकडे जाऊन समाजमनावर अधिराज्य गाजवतात. महाराणा प्रताप हे असेच एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व आहे. स्मृतीदिनानिमित्त महाराणा प्रताप यांचे स्मरण करताना त्यांना केवळ हल्दीघाटीच्या रणांगणावर लढणारा पराक्रमी योद्धा म्हणून पाहणे अपुरे ठरेल. त्यांच्या जीवनाचा खरा अर्थ त्यांच्या सामाजिक कार्यात, प्रजेप्रती असलेल्या निष्ठेत, स्वाभिमानाच्या भूमिकेत आणि लोककल्याणासाठी केलेल्या त्यागात दडलेला आहे. महाराणा प्रताप यांचे संपूर्ण जीवन हे समाजकेंद्रित विचारांचे, मानवी मूल्यांचे आणि स्वातंत्र्याच्या व्यापक अर्थाचे प्रतीक होते.

सोळाव्या शतकातील भारत हा सत्तासंघर्षांचा, साम्राज्यविस्ताराचा आणि सामाजिक उलथापालथींचा काळ होता. मुघल साम्राज्याच्या विस्तारामुळे अनेक प्रादेशिक राज्यांवर परकीय सत्तेचे वर्चस्व निर्माण झाले होते. अकबराच्या काळात अनेक राजांनी मांडलिकत्व स्वीकारून आपले राज्य, वैभव आणि व्यक्तिगत सुरक्षितता जपण्याचा मार्ग निवडला. परंतु महाराणा प्रताप यांनी हा मार्ग नाकारला. त्यांनी परकीय सत्तेच्या अधीन जाणे म्हणजे केवळ राजकीय पराभव नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक अधःपतन असल्याचे स्पष्टपणे ओळखले. त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्य म्हणजे फक्त सत्ता नव्हे, तर समाजाचा आत्मसन्मान, सांस्कृतिक अस्मिता आणि मूल्यनिष्ठ जीवन होते.

महाराणा प्रताप यांची सामाजिक भूमिका त्यांच्या प्रजाभिमुख नेतृत्वातून स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी स्वतःला कधीही प्रजेपेक्षा श्रेष्ठ मानले नाही. राजा म्हणजे ऐश्वर्य उपभोगणारा नव्हे, तर समाजाच्या दुःखात सहभागी होणारा सेवक असतो, हा विचार त्यांनी आपल्या कृतीतून अधोरेखित केला. संकटाच्या काळात त्यांनी राजवाडे, सुखसोयी आणि वैभवाचा त्याग करून आपल्या प्रजेबरोबर जंगलात, डोंगरदऱ्यांत कष्टाचे जीवन स्वीकारले. हा त्याग केवळ व्यक्तिगत नव्हता, तर समाजाशी असलेल्या त्यांच्या अतूट नात्याचे प्रतीक होता. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हे नेतृत्व ‘लोककेंद्रित सत्तेचे’ आणि ‘सामाजिक जबाबदारीच्या राजसत्तेचे’ उत्कृष्ट उदाहरण ठरते.



हल्दीघाटीच्या युद्धानंतर महाराणा प्रताप यांचे आयुष्य अत्यंत कष्टमय झाले. अन्नधान्याची टंचाई, आर्थिक अडचणी, सततचा संघर्ष आणि मुघल सत्तेचा दबाव असूनही त्यांनी आपल्या प्रजेचा त्याग केला नाही. उलट, या प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी समाजाला धैर्य, आशा आणि आत्मसन्मानाची जाणीव करून दिली. जंगलात राहून त्यांनी जे कष्टाचे जीवन जगले, ते समाजासाठी प्रेरणादायी ठरले. त्यांच्या जीवनातून समाजाला हे समजले की स्वातंत्र्य टिकवण्यासाठी त्याग, संयम आणि संघर्ष अपरिहार्य असतो. महाराणा प्रताप यांच्या सामाजिक कार्याचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचा आदिवासी समाजाशी असलेला घनिष्ठ संबंध. त्या काळात आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले जात होते आणि त्यांच्याकडे दुय्यम दृष्टिकोनातून पाहिले जात होते. परंतु महाराणा प्रताप यांनी या समाजाला स्वराज्याच्या संघर्षात समान भागीदार मानले. आदिवासी समाजाने महाराणा प्रताप यांना जंगलात अन्न, निवारा, मार्गदर्शन आणि संरक्षण दिले. हे नाते परस्पर सन्मान, विश्वास आणि समानतेवर आधारित होते. महाराणा प्रताप यांनी आदिवासी समाजाच्या श्रमशीलतेचा, निष्ठेचा आणि स्वातंत्र्यप्रिय स्वभावाचा सन्मान केला. त्यामुळे समाजातील वंचित घटक स्वराज्याच्या लढ्यात सक्रिय सहभागी झाले आणि सामाजिक समावेशनाचा एक आदर्श निर्माण झाला. स्वावलंबन ही महाराणा प्रताप यांच्या सामाजिक विचारांची केंद्रस्थानी असलेली संकल्पना होती. मुघल सत्तेने मेवाडवर आर्थिक नाकेबंदी केली तेव्हा राज्यात दारिद्र्य, उपासमारीची आणि असुरक्षिततेची परिस्थिती निर्माण झाली. अशा वेळी परकीय सत्तेकडून मदत स्वीकारण्याऐवजी महाराणा प्रताप यांनी स्थानिक साधनसंपत्तीचा उपयोग करण्यावर भर दिला. जंगलसंपत्ती, शेती, पशुपालन, हस्तकला आणि स्थानिक उद्योग यांच्या माध्यमातून समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हा दृष्टिकोन केवळ आर्थिक नव्हता, तर सामाजिक आत्मनिर्भरतेचा आणि स्वाभिमानाचा पाया घालणारा होता. पुढील काळातील स्वदेशी चळवळीच्या विचारांचे बीज या धोरणात दिसून येते.

महाराणा प्रताप यांच्या जीवनातील नैतिक मूल्ये त्यांच्या सामाजिक कार्याचा कणा होती. त्यांनी युद्धातही मानवी मूल्यांचे उल्लंघन केले नाही. स्त्रिया, मुले आणि सामान्य नागरिक यांच्यावर अन्याय होणार नाही, याची त्यांनी विशेष काळजी घेतली. युद्ध जिंकण्यासाठी अनैतिक मार्गांचा अवलंब करणे त्यांनी नाकारले. शत्रूशी लढताना देखील नीती, प्रामाणिकपणा आणि सन्मान यांचा त्याग त्यांनी केला नाही. समाजाला त्यांनी हे शिकवले की उद्दिष्ट कितीही महान असले तरी साधने शुद्ध आणि नैतिक असली पाहिजेत.

स्त्रियांच्या सन्मानाबाबत महाराणा प्रताप यांची भूमिका अत्यंत प्रगत आणि संवेदनशील होती. त्या काळात स्त्रियांना युद्धकैदी बनवणे, अपमानित करणे किंवा त्यांच्यावर अत्याचार करणे सामान्य मानले जात असताना महाराणा प्रताप यांनी अशा कृत्यांना ठाम विरोध केला. स्त्री ही समाजाची आधारस्तंभ आहे, तिचा सन्मान म्हणजे समाजाचा सन्मान आहे, ही भावना त्यांच्या धोरणांतून आणि कृतीतून स्पष्टपणे व्यक्त होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही भूमिका स्त्री-सन्मान आणि मानवी हक्कांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरते.

महाराणा प्रताप यांनी शिक्षण, संस्कार आणि सांस्कृतिक परंपरा यांना देखील महत्त्व दिले. त्यांनी आपल्या कुटुंबात आणि सहकाऱ्यांमध्ये शौर्याबरोबरच नीतिमूल्ये, समाजनिष्ठा आणि देशभक्तीचे संस्कार रुजवले. त्यांच्या पुत्र महाराणा अमरसिंह यांच्यात दिसणारी स्वाभिमानाची, लोककल्याणाची आणि संघर्षशीलतेची भावना ही महाराणा प्रताप यांच्या संस्कारांचीच देणगी होती. सामाजिक नेतृत्वाची ही परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचली आणि मेवाडच्या स्वाभिमानाची ज्योत अखंड प्रज्वलित राहिली.

महाराणा प्रताप यांचे सामाजिक कार्य केवळ मेवाडपुरते मर्यादित नव्हते. त्यांच्या संघर्षामुळे संपूर्ण भारतीय समाजाला स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि सांस्कृतिक अस्मितेचे महत्त्व पटले. त्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा, पराभव न मानण्याचा आणि समाजहित सर्वोच्च मानण्याचा मार्ग होता. त्यामुळे महाराणा प्रताप हे केवळ इतिहासातील योद्धे न राहता लोकनायक ठरले. त्यांच्या जीवनकथेतून समाजाला संघर्षाची दिशा आणि मूल्यांची जाणीव मिळाली.

आजच्या काळात महाराणा प्रताप यांचे स्मरण करताना त्यांचे सामाजिक विचार अधिकच समर्पक वाटतात. आजही समाज आर्थिक विषमता, सामाजिक अन्याय, सांस्कृतिक आक्रमण आणि नैतिक अधःपतनाला सामोरे जात आहे. अशा वेळी महाराणा प्रताप यांचे जीवनकार्य आपल्याला मूल्यांवर आधारित संघर्षाची प्रेरणा देते. त्यांनी शिकवले की खरा पराभव हा तलवारीने नव्हे, तर आत्मसन्मान गमावल्याने होतो. समाजासाठी जगणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि मूल्यांशी तडजोड न करणे, हा त्यांचा वारसा आहे.

महाराणा प्रताप यांचे संपूर्ण जीवन म्हणजे सामाजिक जबाबदारीची, त्यागाची आणि लोककल्याणाची जिवंत गाथा होती. त्यांनी सत्ता, संपत्ती आणि वैभवापेक्षा समाजाचे हित मोठे मानले. त्यांच्या त्यागातून आणि संघर्षातून समाजाला स्वातंत्र्याचा खरा अर्थ कळला. म्हणूनच महाराणा प्रताप यांचे स्मरण म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण नसून सामाजिक मूल्यांची पुनःप्रतिष्ठा होय.

स्मृतीदिनानिमित्त महाराणा प्रताप यांना अभिवादन करताना आपण त्यांच्या जीवनातून स्वाभिमान, सामाजिक न्याय, समता, स्वावलंबन आणि लोककल्याणाची प्रेरणा घ्यायला हवी. महाराणा प्रताप हे तलवारीपेक्षा मूल्यांवर विश्वास ठेवणारे, समाजासाठी जगणारे आणि इतिहासाला दिशा देणारे महान व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या विचारांची आणि कार्याची उज्ज्वल परंपरा जपणे, हेच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

– डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान १ वरून पुढे...

## राज्याच्या राजकारणात...

बैठक होणार होणार आहे. तशी खात्रीलायक माहिती सूत्रांनी दिली आहे.दरम्यान, राज्यात शिवसेनेचे दोन्ही गट एकमेकांचे कट्टर राजकीय विरोधक आहेत. नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत या दोन्ही पक्षांनी एकमेकांविरोधात निवडणूक लढवली. असे असतानाच आता धाराशीवमध्ये एकत्रिकरणाच्या प्रयोगाची चर्चा होत आहे. त्यामुळे भविष्यात नेमके काय होणार ? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## बीडमध्ये पोलीस....

नेकनूर-येळंब रस्त्यावर या पोलीस व्हॅनने अमोल यांच्या दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, अमोल हांडगे यांचा एक पाय जागीच तुटला होता आणि शरीराला गंभीर जखमा झाल्या होत्या. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अमोल आणि विक्रम यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. अमोल यांची प्रकृती चिंताजनक असल्याने डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, मात्र आज त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्यासोबत असलेले विक्रम हांडगे यांची प्रकृती अद्यापही गंभीर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अमोल हांडगे हे एक कष्टाळू तरुण शेतकरी होते. त्यांच्या अकाली निधनाने हांडगे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. विशेष म्हणजे, ज्या पोलीस व्हॅनने हा अपघात केला, त्यामध्ये कोट्यवधींच्या घोटाळ्यातील आरोपी होते. आरोपींना सुरक्षित नेण्याच्या घाईत पोलिसांच्या गाडीने एका निष्पाप कष्टकरी शेतकऱ्याचा बळी घेतल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये निर्माण झाली आहे. या अपघातात आरोपी अर्चना कुटे यांना किरकोळ दुखापत झाली असून सुरेश कुटे सुखरूप आहेत. मात्र, या घटनेमुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर आणि वेगावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका

◆ पान १ वरून पुढे...

हसत्याखेळत्या कुटुंबाचा आधार हिरावला गेल्याने नेकनूर परिसरात सुतकी कळा पसरली असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## बीडच्या GST...

कपिलधार कमानीजवळील बायपास रोडवर, पाली परिसरात त्यांची कार उभी असल्याचे काही नागरिकांना दिसले. माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता, गाडीत सचिन जाधवर यांचा मृतदेह आढळून आला.

पोलिसांनी जेव्हा घटनास्थळाचा पंचनामा केला आणि जाधवर यांच्या कारची कसून झडती घेतली. तेव्हा त्यांना गाडीत एक सुसाईड नोट सापडली. या चिठ्ठीमध्ये सचिन जाधवर यांनी आपल्या टोकाच्या निर्णयाचे कारण स्पष्ट केले आहे. जीएसटी विभागातील वरिष्ठ अधिकारी दिलीप फाटे यांच्या छळाला कंटाळून आपण आपले जीवन संपवत असल्याचा धक्कादायक उल्लेख त्यांनी या नोटमध्ये केला आहे. वरिष्ठांकडून होणारा मानसिक त्रास सहन न झाल्याने त्यांनी हे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर येत आहे. सुसाईड नोटमध्ये उल्लेख असलेल्या व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतलं या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवली आहेत. बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुसाईड नोटमध्ये नाव असलेले आरोपी अधिकारी दिलीप फाटे यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. जाधवर यांचा मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालय, बीड येथे शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, पोलीस या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करत आहेत.

## फेब्रुवारीत होणार...

विद्याथ्यर्थ्यांनी कोणत्या प्रश्नात चूक केली हे शिक्षकांना समजेल.

◆ पान १ वरून पुढे...

त्यामुळे त्या भागाचा अधिक सराव करता येईल. प्रत्येक सराव परीक्षा परीक्षेच्या वातावरणात घेतली जाईल.

## जोरदार पावसाचा....

महिने उन्हाळ्याचे असणार आहेत. तरीही या कालावधीत फारशी पाणीटंचाई जाणवणार नसल्याचे चित्र आहे. प्रशासनाच्या अंदाजानुसार जून अखेरपर्यंत जिल्ह्यात पाणी उपलब्ध राहण्याची शक्यता आहे.

तालुकानिहाय धरणांतील पाणीसाठा

जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील प्रकल्प आणि उपयुक्त पाणीसाठ्याची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:

गेवराई : ७ प्रकल्प – ५५.०३८
शिरूर : ११ प्रकल्प – ९.९६७
पाटोदा : १३ प्रकल्प – २८.२९४
आष्टी : २९ प्रकल्प – १८.०६०
केज : १५ प्रकल्प – ६८.१०८
धारूर : ७ प्रकल्प – १९.९९८
वडवणी : १० प्रकल्प – १३.९७७
अंबाजोगाई : १२ प्रकल्प – ४४.५२४
परळी : १३ प्रकल्प – १५.९७४
माजलगाव : ४१.६२३
बीड : २४ प्रकल्प – ६०२.१५१ / २८६.५८८
एकूण : १६७ प्रकल्प – ६४५.५२१ उपयुक्त पाणीसाठा

विहिरी, बोअरला मुबलक पाणी

सद्यस्थितीत ग्रामीण भागातील विहिरी व बोअरवेलमध्ये भरपूर पाणी उपलब्ध आहे. पाणीपातळी लक्षणीयरीत्या वाढल्याने अनेक ठिकाणी बोअर घेताच पाणी लागत असल्याचे चित्र आहे.

धरणांलगत असलेल्या विहिरी व बोअरमध्येही समाधानकारक पाणी

◆ पान १ वरून पुढे...

असल्याने शेतकरी व नागरिकांना दिलासा मिळाला आहे. कोणत्याही भागातील धरणे कोरडी नसून पाण्याची पातळी स्थिर आहे. सध्या जिल्ह्यात थंडीचा कडाका असल्याने धरणांतील पाण्याचे बाष्पीभवन मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. दिवसा ऊन असले तरी तीव्रता कमी असून रात्री गारवा अधिक जाणवतो. सकाळी दहा वाजेपर्यंत ग्रामीण भागात गारठा जाणवत असल्याने पाणीसाठ्यावर सकारात्मक परिणाम होत आहे. दरवर्षी रब्बी पिकांना पाणी देताना शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. मात्र यंदा मुबलक पाणीसाठा असल्याने रब्बी पिकांना पाणी देण्यासाठी कोणतीही अडचण नाही. परिणामी यंदा रब्बी पिकांचे उत्पादन चांगले होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. एकूणच, यंदा बीड जिल्ह्यातील पाण्याची स्थिती आशादायी असून, शेतकरी, नागरिक आणि प्रशासन सर्वांसाठी हा मोठा दिलासा ठरत आहे.

## खा. सोनवणे...

रुग्णांना दर्जेदार, वेळ-ऋवर व सुलभ आरोग्यसेवा मिळावी, रुग्णालयातील सुविधा अधिक सक्षम व्हाव्यात तसेच दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या अडचणींवर ठोस निर्णय घेण्यात यावा, या उद्देशाने ही आढावा बैठक घेण्यात येणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. बैठकीत रुग्णसेवेशी संबंधित विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा करून आवश्यक त्या उपाययोजना सुचविण्यात येणार आहेत. खा. बजरंग सोनवणे यांनी बीड जिल्ह्यात आरोग्य, शिक्षण व दळण-वळण या मूलभूत विषयांना नेहमीच प्राधान्य दिले आहे. जिल्ह्यातील विविध आरोग्य केंद्रांना ते वेळोवेळी अचानक भेटी देत असल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क राहते. जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना उत्तम उपचार व सुविधा मिळाव्यात, हा त्यांचा मुख्य उद्देश असून, त्या दृष्टीनेच 'स्वाराती'तील या आढावा बैठकीकडे विशेष महत्त्व दिले जात आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## रासेयो स्वयंसेवकांनी...

एस. एस. साखरे, धारुर शहराचे स्वीकृत नगरसेवक श्री. मयूर सावंत, पत्रकार अविनाश जगताप, उपप्राचार्य प्रा. एम. ए. जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड उद्घाटन समारंभाची सुरूवात राजमाता जिजाऊ व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव यांनी या शिबिराच्या माध्यमातून गावामध्ये होणाऱ्या विविध उपक्रमांचे स्वरूप सांगितले. उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. विजयकुमार कुंभारे यानंतर आभार प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी मानले. या समारंभास किल्लेधारूर शहर व परिसरातील ग्रामस्थ, रासेयो स्वयंसेवक यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

## २4 तासांत ....

करण्यात आले.ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली झडख पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, हेमा वाघमारे, पोशी योगेश निर्धार, गजानन चौधरी तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, बीडच्या पथकाने केली. AHTU पथकाच्या तत्परतेमुळे अल्पवयीन पीडितेला सुरक्षिततेचा दिलासा मिळाला असून आरोपीवर कायदेशीर कारवाई सुरू आहे.

## खरात आडगाव...

सोडल्या जाणाऱ्या काजळीमुळे तीव्र वायुप्रदूषण होत आहे. या काजळीचा परिणाम थेट नागरिकांच्या श्वसनसंस्थेवर होत असून लहान मुले, महिला व वृद्धांमध्ये श्वसनाचे आजार वाढत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. काजळी श्वसनावाटे शरीरात जात असल्याने अनेकांना दीर्घकालीन आरोग्य समस्या उद्भवत आहेत. ग्रामपंचायतीचा आणखी एक गंभीर आरोप म्हणजे, जय महेश साखर कारखाना ग्रामपंचायत अधिकार क्षेत्रात अवैधरित्या कार्यरत असून आजपर्यंत ग्रामपंचायतीकडे एकही रुपयाचा कर भरणा करण्यात आलेला नाही.याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही कारखाना प्रशासनाने कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही. या सर्व बाबी लक्षात

◆ पान ४ वरून पुढे...

घेता, ग्रामपंचायत खरात आडगावच्या वतीने दि. २६ जानेवारी २०२६ रोजी ऊस वजन काटा बेमुदत बंद ठेवून उपोषण** करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या सर्व परिणामांची तसेच होणाऱ्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी संबंधित साखर कारखान्यावर राहील, असे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले आहे.दरम्यान, या आंदोलनामुळे परिसरातील साखर वाहतूक आणि कारखान्याच्या कामकाजावर मोठा परिणाम होण्याची शक्यता असून, प्रशासन व कारखाना व्यवस्थापन याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## धनगर समाजाच्या...

समाजबांधवांचा जाहीर पाठिंबा असून, सर्व समाजबांधवांनी या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे यांनी केले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड तसेच नेकिनूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, कल्याण वाणी, रविंद्र निर्मळ, सुरेश निर्मळ, बाळासाहेब मुळे, बाळासाहेब मोरे पाटील, अनंतकाका मुळे, हरिओम क्षीरसागर, संदीप मुळे, शहादेव धलपे, गणपत तागड, रामदास मुळे, रामचंद्र मुळे,महावीर मुळे, संतोष वाणी, विनायक वाणी, संजय सुकाळे, प्रविण मुळे, जीवन मुळे, रोहन तागड, रामराजे मुळे, नवनाथ मुळे, केशव गिरे, कल्याण कोकाटे, दत्ता मुळे, आप्पा मुळे अमोल पितळे, बंडू ढगारे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकनेते सुंदररावजी...

तांत्रिकदृष्ट्या योग्य व वाहनांची घेतलेली वजने बरोबर येत असले बाबत अभिप्राय आणि वजन काट्यामध्ये कोणताही दोष नसल्याबाबतचा अभिप्राय विशेष पथकाने नोंदवला आहे .यावेळी पथका समवेत कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री आर .सी .बडगुजर साहेब ,श्री एस.एस.शिनगारे जनरल मॅनेजर (ईंजिनिअरीग),मुख्य शेतकरी अधिकारी श्री आर .आर

◆ पान ४ वरून पुढे...

.देशमुख ,केनयार्ड सुपरवायझर श्री आर.पी.चाटे व ऊस उत्पादक शेतकरी वाहतूक ठेकेदार उपस्थित होते.

## टी.बी.गिरवलकर...

– ८९.१८ टक्के (द्वितीय), अंकिता अशोक हाके – ८८.९४ टक्के (तृतीय), प्रथम वर्ष शाखा – संगणक अभियांत्रिकीचे विद्यार्थी जान्हवी मुकुंद कराड – ८६.३५ टक्के (प्रथम), शर्वरी शिरीष हालकंचे – ८६.०० टक्के (द्वितीय), हर्षसिंग किरणसिंग रेखावल – ८५.०० टक्के (तृतीय), तृतीय वर्ष शाखा – इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी पांडुरंग प्रेमराज पवार – ९१.६५ टक्के (प्रथम), वैष्णवी श्रीधर नागरगोजे – ९०.४७ टक्के (द्वितीय), अजित नरसिंग मुंडे – ८८.०० टक्के (तृतीय), द्वितीय वर्ष शाखा – इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी आदित्य अंगद औताडे – ८२.३५ टक्के (प्रथम), प्रसाद लहू गायकवाड – ८१.५३ टक्के (द्वितीय), गौरी संजय फुन्ने – ७९.२९ टक्के (तृतीय), प्रथम वर्ष शाखा – इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी अमरजा गंगाराम कांबळे – ८२.२४ टक्के (प्रथम), अक्षता व्यंकटराव चव्हाण – ८०.३६ टक्के (द्वितीय), शुभम सुभाष मुंडे – ८०.२४ टक्के (तृतीय), तृतीय वर्ष शाखा – मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी भूमिका गोपाल परदेशी – ८१.५३ टक्के (प्रथम), आदित्य रविंद्र चव्हाण – ८१.४१ टक्के (द्वितीय), ज्ञानेश्वरी बळीराम सिरसाट–७९.२९ टक्के (तृतीय), द्वितीय वर्ष शाखा – मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी सायली संतोष वायसे – ८२.६७ टक्के (प्रथम), ओमकार अशोक रेणावरकर – ७८.७८ टक्के (द्वितीय), रितेश संभाजी घोरपडे – ७६.६७ टक्के (तृतीय), प्रथम वर्ष शाखा – मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी मंथन दत्तात्रय महामुनी – ८२.२४ टक्के (प्रथम), श्रद्धा मारूती कुकर – ७७.७७ टक्के (द्वितीय), पृथ्वीराज विक्रम मोरे – ७७.६५ टक्के (तृतीय), द्वितीय वर्ष शाखा – सिव्हिल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी आदित्य जगन्नाथ दराडे – ८५.६५ टक्के (प्रथम), सुमित दशरथ चटप – ८१.६५ टक्के (द्वितीय), शिवप्रसाद वैजनाथ गिरवलकर – ७६.७१ टक्के (तृतीय), प्रथम वर्ष शाखा – सिव्हिल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी ओम मुकुंद साबणे – ९१.२९ टक्के (प्रथम), सुरज संदेश होळंबे – ८५.१८ टक्के (द्वितीय), दर्शना दिलीप चौरे – ८२.०० टक्के (तृतीय), द्वितीय वर्ष शाखा

◆ पान ४ वरून पुढे...

– इलेक्ट्रॉनिक्स ऍण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचे विद्यार्थी गायत्री सदाशिव मुंडे – ९०.०० टक्के (प्रथम), अंजली नरहरी घायतिडक – ८४.८२ टक्के (द्वितीय), पियुष संतोष राऊत – ८२.१२ टक्के (तृतीय), प्रथम वर्ष शाखा – इलेक्ट्रॉनिक्स ऍण्ड ण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचे विद्यार्थी वैष्णवी नानाभाऊ बडे – ८२.१२ टक्के (प्रथम), चेतन सुरेश रोगी – ८१.४१ टक्के (द्वितीय), पायल विठ्ठल नाकुरे – ७७.५३ टक्के (तृतीय) क्रमांक मिळवला आहे. या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, सचिव माधवराव पाटील (टाकळीकर), सहसचिव सुनील मिटकरी आणि सर्व सन्माननीय सदस्य तसेच कॅम्पस डायरेक्टर डॉ.बी.आय.खडकभावी, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कार्यवाह प्राचार्य एन.ए.रावबावले, पॉलिटेक्निकचे प्राचार्य एल.व्ही.बगले, सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. यासंदर्भात बोलताना कॅम्पस डायरेक्टर डॉ.बी.आय.खडकभावी यांनी सांगितले की, हे पॉलिटेक्निक मागील ४२ वर्षांपासून ग्रामीण भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दर्जेदार तंत्रशिक्षण देत आहे. संस्थेचे अनेक विद्यार्थी आज देश-विदेशात विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत असून पॉलिटेक्निकचा निकाल दरवर्षी उंचावत आहे. त्यामुळे संस्थेचे नांव महाराष्ट्रात अग्रस्थानी आहे.

## अनादरीत धनादेशा...

आरोपीच्या वतीने सावकारकीचा बचाव घेण्यात आला व त्याने फिर्यादी कडून व्याजाने पैसे घेतले होते व त्याने दिलेला सुरक्षा पोटीचा धनादेशाचा गैरवापर केल्याचा बचाव घेण्यात आला परंतु मा. न्यायालयाने आरोपीचा बचाव फेटाळून लावला व प्रकरणांमध्ये आरोपीने कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट क्ट प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे महत्त्वपूर्ण निकाल देऊन आरोपी अशोक निवृत्ती जाधव , यांना सात लाख रुपये दंड व सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे सदर प्रकरणात फिर्यादीच्या वतीने ॲड. शशिकांत सावंत यांनी भक्कम बाजू मांडली, त्यांना ॲड. विशाल विलासराव कदम,ॲड. अभिषेक बहिर,ॲड. माऊली डाके ॲड. राजकुमार धरणे,ॲड. मुकुंद लोणकर ॲड. प्रदीप दराडे ॲड. विजय डोके,ॲड. अमोल तिडके,ॲड. प्रतीक गव्हाणे यांनी सहकार्य केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# उद्या गोरक्षनाथ टेकडी येथे ७५ व्या अमृत महोत्सवी सप्ताह सांगता

## अमृततुल्य काल्याच्या कीर्तनास उपस्थित राहावे: ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज




**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत श्री ह भ प वैकुंठवासी सद्गुरु किसन बाबा महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या कृपाशीर्वादाने व ह भ प गुरुवर्य शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित ७५ वा अमृत महोत्सवी वर्ष धर्मनाथ बीज अखंड हरिनाम सप्ताह सांगता उद्या दिनांक २० जानेवारी २०२ २६ रोजी मंगळवारी सकाळी १० ते ११ या वेळेत ह भ प शांतिब्रह्म नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री शेत्र गोरक्षनाथ टेकडी यांचे भाविक भक्तांना धर्मनाथ बीज निमित्त प्रवचन होईल त्यानंतर दुपारी १२ ते ०२ या वेळेत ह भ प अक्रूर महाराज साखरे गेवराई यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तनाने होईल व नंतर महाप्रसादाच्या महापंक्ती होतील तरी जास्तीत जास्त भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या वतीने करण्यात येत आहे. गुरुवर्य किसन बाबा महाराज यांनी सुरू केलेल्या धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या कीर्तन महोत्सवामध्ये काकडा भजन विष्णुसहस्रनाम ज्ञानेश्वरी पारायण गाथा भजन प्रवचन हरिपाठ भावार्थरामायण हरी किर्तन संगीत भजन व हरिजागर असे हरी नामस्मरणाचे भव्य कार्यक्रम संपन्न होत आहेत. गुरुवर्य वैकुंठवासी किसन बाबा महाराज यांनी ७५ वर्षांपूर्वी श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात केली यावर्षी हे या शब्दाचे ७५ वे वर्ष असून अमृत महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह ची सांगता उद्या संपन्न होणार आहे.



*श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज हरिपाठ करताना.*

### ● भाविक भक्तांची व्यवस्था

१) १ एकर ४ गुंठे भव्य दिव्य डोम मध्ये बसण्याची व्यवस्था. २)२ एकर रिकामी जागा साफ करून कीर्तन वेळेत बसण्याची व्यवस्था. ३) ५ एकर मध्ये मोठ्या गाड्यांची पार्किंग व्यवस्था . ४)२ एकर मध्ये टू व्हिलर पार्किंग व्यवस्था

### ● महाप्रसाद व्यवस्था

महाप्रसाद साठी २५ कुंटल बुंदीचा महाप्रसाद तयार करण्यास दोन दिवसापासून सुरुवात. महाप्रसाद वाटपा करिता परिसरातील पिकप ची व्यवस्था व सेवकांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. महापंगत बसण्याची व्यवस्था एक एकर चार गुंठे डोम दोन एकर रिकामी जागा असे एकूण तीन ते चार एकर मध्ये पण तिची बसण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

### ● सांगता दिनाचे दैनंदिन कार्यक्रम

परंपरेप्रमाणे घाटसावळी ग्रामस्थांच्या वतीने बाबांना आहेर आहे . १० ते ११ गुरुवर्य शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज यांचे धर्मनाथ बीज निमित्त प्रवचन. दुपारी १२ ते ०२ ह भ प अक्रूर महाराज साखरे यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन. काल्याचे किर्तन झाल्यानंतर महाप्रसादाच्या महापंथी होतील. रात्री साडेआठ ते अकरा ह भ प रामायणाचार्य पद्मकर महाराज देशमुख अमरावती यांचे धर्मनाथ बीज निमित्त कीर्तन संपन्न होईल. रात्री ११ ते पहाटे चार वाजेपर्यंत हरी जागर संपन्न होईल

## ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांची जयंती राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा



**बीड । प्रतिनिधी**

सौ. के. एस.के महाविद्यालयात शारिरीक शिक्षण विभाग व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांची जयंती साजरी करण्यात आली. याकार्यक्रमास विशेष उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर म्हणाले की, प्रत्येक बिकट परीस्थितीवर मात करुन वीर खाशाबा जाधव यांनी ऑलिम्पिक पर्यंत मजल मारली. हे त्यांच्या कडून शिकण्या सारखे आहे. तसेच उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करताना सर्व सोयीसूविधा देण्यासाठी महाविद्यालय कटिबध्द आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वंभर देशमाने, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, उपप्राचार्य अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. ए.एस.खान, कमवि डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर तसेच क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भागचंद सानप, डॉ. शेख शकील रहिम, डॉ. ज्ञानेश्वर घोडके, डॉ. प्रियंका नवले, प्रा. अमृतसिंग बिसेन तसेच क्रीडा विभागातील सर्व कर्मचारी तसेच खेळाडू मोठया संख्येने उपस्थित होते.

## केशवराज संस्थान केसापुरी (प.) येथे अखंड हरिनाम सप्ताहास आजपासून आरंभ

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी मौजे केशवराज संस्थान केसापुरी (परभणी) येथे केशवराज कृपेने, कै. ह.भ.प.दत्ता महाराज कोरडे पिंपळनेरकर, कै. हभ.प.आत्माराम महाराज केसापुरीकर यांच्या आशीर्वादाने आज पासून अखंड हरीनाम सप्ताहास आरंभ होत आहे. सात दिवस चालणार्या हरिनाम सप्ताहामध्ये वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज यांच्या अभंगांवर प्रवचने, कीर्तने होतात तर ज्ञानेश्वरी पारायण, श्रीमद् भागवत कथा, प्रवचण, भजण, हरी किर्तन हरिजागर, काकडा या सारख्ये उपक्रम सात दिवस मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. ज्यामुळे ग्रामीण भागातील लोकांमध्ये अध्यात्मिक जागृती



आणि भगवंतांच्या नामाचा प्रचार आणि प्रसार होतो. अखंड हरिनाम सप्ताहामध्ये सात दिवस भरगच्च दैनंदिन कार्यक्रम राहणार आहेत. ज्यामध्ये पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ६ ते ७ विष्णू सहस्त्रनाम, ७ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १ गाथा भजन, दुपारी १ ते ३ भोजन, ३ ते ५ भागवत कथा, साय. ५ ते ६:३० हरिपाठ, ६:३० ते ७ आरती, रात्री ८:३० ते ११ हरिकीर्तन नंतर हरी जागर होईल. दि.२६ रोजी दुपारी १२ ते ०२ या वेळेत ह.भ.प.वसंत महाराज कोरडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल, त्यानंतर महाप्रसादाची महापंगत होईल. तरी पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी या ज्ञानमृताचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ केसापुरी (प.) यांच्याकडून करण्यात आले आहे. ह.भ.प. शिरीष महाराज ठोसर यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीमद् भागवत कथा- सात दिवस चालणार्या या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये ही महिलांची संख्यालक्षणीय असते. त्यामुळे या सप्ताहामध्ये महिलांसाठी श्रीमद् भागवत कथा आयोजित केली असून कथा प्रवक्ते ह.भ.प. शिरीष महाराज ठोसर यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीमद् भागवत कथा ऐकायला मिळणार आहे.

**'केशव' अवतार- भगवान विष्णू ने केशी दैत्याचा वध करण्यासाठी केशवाचे (केशवराज) रुप धारण केले. केशी दैत्याचा वध केला व नंतर केशवराज म्हणून भगवान विष्णूची पुजा होऊ लागली. मराठवाड्यात माजलगाव येथील केसापुरी कँप, लातुर, पाटोदा दासखेड येथे केशवराज मुर्ती आहे. स्वयंभू व पाषाण आकर्षक मुर्ती केसापुरी (प.) येथे पाहायला मिळते.**

## के.एस.पी. विद्यालय येथे आनंद मेळावा (बाजार मेळा) उत्साहात साजरा



**बीड । प्रतिनिधी**

दि.१७/०१/२०२६ रोजी के.एस.पी. विद्यालय, कालिका नगर, बीड येथे आनंद नगरी (बाजार मेळा) उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या मेळाव्यामध्ये खाऊचे दुकाणे, खेळणी, भाजीपाला, आईस्क्रीम स्टॉल, विविध गेम इत्यादी प्रकारचे व्यवसायिक दुकानांचे आयोजिन केले होते. विद्यार्थ्यांनी आप-आपले दुकाने थाटात मांडले होते. शाळेत दरवर्षी साजरा होणारा आनंद मेळावा हा विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी एक अत्यंत आनंददायी आणि उत्साहवर्धक कार्यक्रम असतो. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालक एकत्र येऊन एकमेकांशी स्नेह वाढवतात. या कार्यक्रमाचा उद्धेश विद्यार्थ्यांमध्ये, व्यावसायिक कौशल्य, स्वावलंबन, चिकाटी, कष्टाळूपणा इत्यादी गुणांना वाव मिळतो. विद्यार्थ्यांने स्वत: केलेल्या कमाईचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके, (जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख) , सौ.अंजलीताई शेळके, शाळेचे प्रा. मुख्याध्यापक विशाल सुपेकर, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पालक यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला.

# तलवाड्यातील मुख्य बाजार पेठचा डांबरी रस्ता स्थानिक व तालुका स्तरिय लोकप्रतिनिंधीच्या उदासीनतेमुळे आरुंद

### छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नविन बस स्थानकचा डांबरी रस्ता आतिक्रमणाने वेढला

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील मुख्य बाजार पेठचा डांबरी रस्ता स्थानिय गाव पुढाऱ्यांनी व तालुका स्तरिय नेतृत्वाने मताच्या गणीतामुळे अरुंद ठेवल्याची चर्चा होतांना ऐकावयास मिळत असुन याच मुख्य रस्त्याला लगट त्वरिता गाव तलाव असुन या तलावाच्या संरक्षण भीतीला अनुसरुण लगट गावच्या पिण्याच्या पाण्याची मुख्य सार्वजनिक पाइपलाइन व पाइपलाइनचे अंतर वगळता हा मुख्य डांबरी रस्ता आसतांना तलवाडा येथील स्थानिय गाव पुढाऱ्यांनी राजकारणासाठी आणेकांना तलाव व मुख्य डांबरी रस्त्याच्या मधोमध भाडे तत्वावर म्हणत मोठी आर्थिक तडजोड करत विविध दुकाने थाटन्यास सहमत्या दर्शवल्याचे नागरिकातुन



ऐकावयास मिळत असुन आज मितीला भाडे तत्वाधानचे भान विसरुन भाडे करुंनी त्वरिता गाव तलावाची संरक्षण भिंत कोरत पिण्याच्या पाण्याची मुख्य पाइपलाइनवर पक्के बांधकाम करत सार्वजनिक बारव ते पुरातन नागोबा देवस्थान पर्यंत तर जायकवाडी कार्नर रस्ता ते बस स्थानक पर्यंत मुख्य डांबरी रस्ता हाद्दीत घुसखोरी करत वाहतुक व रहदारीला मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत आसल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते तर आतिक्रमण धारकांनमुळे हा रस्ता अरुंद आसल्या कारणाने आणेक अपघात या रस्त्याने घडलेली आसल्याचे नागरिक सांगतात तर सुदैवाने जिवित हानी टळलेली आसली तरी वाढती रहदारी व बाजार पेठ आसल्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता या निमित्ताने वर्तवली जात आहे.

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा लढा!

**तलवाडा येथील त्वरिता गाव तलाव संरक्षण भीती लगटचे आतिक्रमण ऊठवण्या संदर्भात संबंधित प्रशासनास स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीड उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन, जयदेव शिंगने व पदाधिकारी गेल्या आणेक महिनो महिण्या पासुन निवेदन देऊन याच तलावात जलसमाधी आंदोलन करणार असल्याचे वारंवार सांगत आले आहे. संबंधित प्रशासनाने आतिक्रमण धारकांना स्वताहुन आतिक्रमण काढुन घेण्या संदर्भात दोन दोन नोटीस देऊन अर्थिक तडजोडीतुन हे प्रकरण पेंडिंग ठेवल्याची चर्चा होत आसल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन, जयदेव शिंगने व पदाधिकारी लाइलाजाने येत्या २६/१ /२०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी तलवाडा गाव तलावात जलसमाधी आंदोलन करणार असल्याचा इशारा नुकताच देण्यात आला असल्याचे बोलल्या जात आहे.**


### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४८/२०२६**

**शांताबाई भ्र. रमाकांत खिंडरे व इतर वि. निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **रमाकांत पि. विश्वनाथ खिंडरे हे / हया दिनांक २१/११/२०२५** रोजी अहिल्यानगर गेवराई, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ शांताबाई भ्र. रमाकांत खिंडरे, वय ८२ वर्षे, धंदा घरकाम रा. मालेगाव खु. ता. गेवराई जि. बीड ह.मु. अहिल्यानगर गेवराई ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ उमेश पि. रमाकांत खिंडरे, वय ५५ वर्षे, धंदा नोकरी रा. मालेगाव खु. ता. गेवराई जि. बीड ह.मु. अहिल्यानगर गेवराई ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ३ सुरेखा भ्र. बंसीलाल उरफाटे, वय ६३ धंदा घरकाम रा. फ्लॅट नं. ६०२, सी-विंग साई घरकाम मिरॅकल, आकाशगंगा सोसायटी के.पास रहाटणी पुणे नगर पुणे महाराष्ट्र ४११०१७ अर्जदार क्र. ४ वंदना. त कांबळे, वय ५०, धंदा घरकाम रा. गणेशनगर गेवराई ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत रमाकांत पि. विश्वनाथ खिंडरे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक १६/०१/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**पुढील तारीख - २५/०२/२०२५**
**(मार्फत ॲड बी. के. निकाळजे, गेवराई)**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर गेवराई**

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ ●

## रासेयो स्वयंसेवकांनी स्वत:तील कौशल्यांचा विकास करणे गरजेचे: उद्घाटन श्री. अशाबोद्दीन शेख



**किल्ले धारुर । प्रतिनिधी**

रासेयो स्वयंसेवकांनी स्वता:तील कौशल्यांना ओळखून त्यांच्या विकास करणे गरजेचे आहे. आपल्यासमोर भारतरत्न सचिन तेंडुलकर, लता मंगेशकर यांचे आदर्श आहेत. यामुळे प्रत्येक स्वयंसेवकांने स्वतःतील क्षमता ओळखून जीवनात यशस्वी झाले पाहिजे असे उद्गार रासेयोजनेच्या उद्घाटकिय मनोगतातून दै. चंपवातिपत्रचे वार्ताहर श्री. अशाबोद्दीन शेख यांनी केले. राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबिर मौजे अंजनडोह येथे दिनांक १७ ते २३ जानेवारी २०२६ रोजी संपन्न होत आहे. अध्यक्षीय समारोपातून महाविद्यालय विकासाचा समितीचे निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे यांनी धारूर परिसरामध्ये होणारा पाऊस अल्प आहे. त्यामुळे समाजामध्ये पाण्याच्या समस्या निर्माण होतात. या समस्यांतून खेडी मुक्त होण्यासाठी स्वयंसेवकांनी पाणलोट क्षेत्र, जलसंधारण या स्वरूपाची कामे करून समाजासमोर आदर्श निर्माण करावा असे सांगितले. प्रमुख अतिथी धारूर तालुका पाणी फाउंडेशनचे श्री. नितीन पाटोळे यांनी शाश्वत विकास होण्यासाठी जलसंधारण, पाणलोट क्षेत्र, निसर्गाचे संवर्धन व जतन यासंबंधी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी क्षेत्रात सहभागी सर्व स्वयंसेवकांना शुभेच्छा दिल्या. खेड्यातील संस्कृती आणि संस्कार युवाशक्तीने आत्मसात करून खेड्याकडे आकर्षित झाले पाहिजे. खेडी स्वयंपूर्ण होण्यासाठी शिबिरातून स्वयंसेवकांनी प्रयत्न करावेत असे सांगितले. गावातील माजी विदयार्थी नोकरीस लागल्या निमित्ताने ज्योतीराम रामराव कांबळे, अविनाश कसपटे, आदित्य रेपे, शकील अल्लाउद्दीन शेख, शुभम आडे या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य मा. श्री. इं. ना. जाधव, सरपंच मा. पी. एस. सोळंके, ग्रामविकास अधिकारी ▶▶ उर्वरित पान २ वर

# माजलगावच्या नव्या बसस्थानकासमोर असलेल्या SBI शाखेत दलालांचा सुळसुळाट

## पंधरा हजार रुपये दिल्यास तात्काळ पीक कर्ज मंजूर – शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप

**माजलगाव । प्रतिनिधी**



शहरातील नव्या बसस्थानकासमोर असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया (डइख) शाखेमध्ये दलालांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात वाढल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. रब्बी हंगामासाठी पीक कर्ज मिळविण्यासाठी खरे शेतकरी महिनोन्महिने बँकेचे उंबरठे झिजवत असताना, दलालांमार्फत अर्ज केल्यास अवघ्या काही कागदपत्रांवर पंधरा ते वीस हजार रुपये घेत तात्काळ कर्ज मंजूर केले जात असल्याचा आरोप शेतकरी वर्गातून होत आहे. खऱ्या शेतकऱ्यांनी सातबारा, ८-अ, जमिनीची नोंद व इतर सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करूनही त्यांना कर्ज नाकारले जात आहे. मात्र दलालांनी अर्ज केल्यास नियम डावलून कर्ज मंजूर होत असल्याने शेतकरी वर्ग मेटाकुटीला आला आहे. खरीप हंगामात व्याजाने पैसे काढून पेरणी करण्यात आली होती. मात्र पावसाच्या लहरीपणामुळे अनेकांचे पीक हातचे गेले. खरीप गेलं, पण रब्बी तरी संसार वाचवेल या आशेने शेतकरी रब्बी पीक कर्जासाठी बँकेकडे धाव घेत आहेत. मात्र माजलगाव डइख शाखेतील काही अधिकारी व कर्मचारी खऱ्या शेतकऱ्यांना कवडीचीही किंमत देत नसून, थेट दलालांमार्फत येण्याच्या सूचना देत असल्याचा गंभीर आरोप होत आहे. एका पीक कर्ज मंजुरीमागे पंधरा हजार रुपये मिळत असल्याने काही बँक कर्मचाऱ्यांची 'दिवाळी' सुरू असल्याची चर्चा शेतकरी वर्गात जोर धरत आहे. यामुळे तालुक्यात प्रचंड असंतोष पसरला असून, परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तातडीने लक्ष घालावे, अशी जोरदार मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे. अन्यथा माजलगाव तालुक्यात शेतकऱ्यांचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी चर्चा शेतकरी वर्गात सुरू आहे.

# 24 तासांत अल्पवयीन पीडितेचा शोध; आरोपी ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**

बीड ग्रामीण गुन्हा रजिस्टर नंबर २०७/२०२५ अन्वये दाखल असलेला गुन्हा (कलम १३७(२) भान्यास) अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे (AHTU) दिनांक १५/०१/२०२६ रोजी दुपारी वर्ग करण्यात आला. तपास वर्ग होताच अवघ्या २४ तासांत अल्पवयीन पीडित मुलीचा शोध घेऊन आरोपीला ताब्यात घेण्यात AHTU पथकाने यश मिळवले. तपासाची सूत्रे स्वीकारल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांनी मूळ फाईलचे सखोल

### PSI पल्लवी जाधव व AHTU पथकाची उल्लेखनीय कामगिरी



अवलोकन केले. त्यानंतर फिर्यादी व साक्षीदारांची भेट घेऊन गुन्ह्याबाबत सविस्तर चौकशी करण्यात आली. मिळालेल्या तांत्रिक माहितीच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करत पीडित मुलगी व आरोपी यांचे वास्तव्य बुलढाणा जिल्ह्यात असल्याचे निष्पन्न झाले. बीड पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार रात्री ९ वाजता AHTU चे पथक बुलढाणा जिल्ह्याकडे रवाना झाले. दिनांक १६/०१/२०२६ रोजी पहाटे ३ वाजता मिळालेल्या माहितीनुसार सोनाळा (ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा) येथे पथकाने शोधमोहीम राबवून पीडित मुलगी व आरोपीला त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणाहून ताब्यात घेतले. पोस्टे सोनाळा येथे आवश्यक नोंद करून पथक त्यांना घेऊन सकाळी ९ वाजता बीडकडे रवाना झाले. बीड येथे आल्यानंतर पीडित मुलीला विश्वासात घेऊन समुपदेशन करण्यात आले तसेच तिची आई-वडिलांशी भेट घडवून देण्यात आली. त्यानंतर पीडित मुलगी व आरोपी यांना पुढील तपासासाठी पोस्टे बीड ग्रामीण येथे हजर ▶▶ उर्वरित पान २ वर

# खरात आडगाव ग्रामपंचायतीचा इशारा

## २६ जानेवारीपासून जय महेश साखर कारखान्याचा ऊस वजन काटा बेमुदत बंद उपोषण: सरपंच दत्ता आढाव



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील खरात आडगाव येथे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे तसेच पर्यावरणाचे संरक्षण व्हावे, या मागणीसाठी ग्रामपंचायतीच्या वतीने येत्या दि. २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७ वाजताजय महेश साखर कारखानायांचा ऊस वजन काटा बेमुदत बंद ठेवून उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती ग्रामपंचायतीने ३१ डिसेंबर रोजी निवेदनाद्वारे दिली आहे.

ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या या साखर कारखान्यातून सोडल्या जाणाऱ्या ईटीपीच्या दूषित पाण्यामुळे गावातील नागरिकांना शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. पिण्याचे पाणी, शेती व परिसरातील पर्यावरण यावर याचा विपरीत परिणाम होत असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच कारखान्याशी संबंधित अनेक जड वाहने दररोज गावातून ये-जा करत असल्याने ग्रामपंचायतीने तयार केलेले रस्ते मोठ्या प्रमाणावर खराब झाले आहेत. त्यामुळे दैनंदिन दळणवळण करताना ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याशिवाय कारखान्याकडून हवेत ▶▶ उर्वरित पान २ वर

# अनादरीत धनादेशा प्रकरणी आरोपीस सात लाख रुपये दंड व सहा महिने शिक्षा: ॲड. शशिकांत सावंत

**बीड । प्रतिनिधी**



येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब ९ वे यांनी महत्त्वपूर्ण निकाल देऊन आरोपीस तब्बल सात लाख रुपयाचा दंड करून सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे, घटनेची हकीकत अशी की, आरोपी अशोक निवृत्ती जाधव,यांनी फिर्यादी अरुण दादाराव सोनवणे,यांच्याकडून रक्कम रुपये सहा लाख रुपये हात उसने म्हणून घेतले होते सदरची रक्कम परत करतेवेळी आरोपी यांनी फिर्यादी यांच्या हक्कांमध्ये रक्कम रुपये सहा लाख रुपयाचा धनादेश दिला होता सदरचा धनादेश बँकेत वाटेल व फिर्यादीस त्याची आरोपीकडे असणारी रक्कम त्यास मिळून जाईल असा शब्द व भरवसा दिला होता, परंतु सदरचा धनादेश बँकेत अनादरीत झाला व खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नाही या कारणाने परत आला त्यामुळे फिर्यादी, यांनी आरोपी यांच्या विरोधामध्ये बीड येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांचे न्यायालयात समरी क्रिमिनल केस क्रमांक. ६३८/२३ अरुण विरुद्ध अशोक असे प्रकरण दाखल केले सदर प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाने गुणदोषावर प्रकरण चालून ▶▶ उर्वरित पान २ वर

# धनगर समाजाच्या आरक्षणासाठी दिपकभाऊ बो-हाडे यांना पाठिंबा देण्यासाठी लिंबागणेश पंचक्रोशीतील धनगर बांधव मुंबईकडे रवाना होणार

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, या प्रमुख मागणीसाठी धनगर समाजाचे नेते दिपकभाऊ बो-हाडे हे दि. २१ जानेवारीपासून मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषणाला बसणार आहेत. त्यांच्या या न्याय्य मागणीला पाठिंबा देण्यासाठी मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज दि. १७ रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील मुख्य प्रवेशद्वारावर धनगर समाजासह अठरापगड जातीतील समाजबांधव मुंबईकडे रवाना होणार असल्याची घोषणा करण्यात आली. यावेळी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. येळकोट येळकोट जय मल्हार, जय मल्हार बोलो, मुंबई चलो, दिपकभाऊ आगे बढो, हम तुम्हारे साथ है, आरक्षण आमच्या हक्काचं आहे, नाही कोणाच्या बापाचं अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडण्यात आला. दिपकभाऊ बो-हाडे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात येणाऱ्या धनगर समाजाच्या आरक्षणासाठीच्या न्याय मागणीला मराठा समाजासह अठरापगड जातीतील ▶▶ उर्वरित पान २ वर



*ॲड.गोविंद शिराळे यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड करण्यात आली त्यामुळे त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना जिल्हा परिषद सदस्य श्री. गणपत आप्पा डोईफोडे दैनिक मराठवाड पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे, कृष्णा शिराळे आदी मान्यवर छायाचित्रात दिसत आहेत.*

# लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे वजन काट्याची विशेष पथकाद्वारे तपासणी

## कारखान्याचे वजन काटे बरोबर असल्याचा पथकाचा अभिप्राय

**माजलगाव । प्रतिनिधी**

प्रत्येक गळीत हंगामामध्ये हंगाम चालु झाल्यानंतर अचानकपणे सहकारी साखर कारखान्याचे ऊस वजन काटयांची वजन फेर पडताळणी करनेसाठी शासनाद्वारे विशेष पथकाची नेमणूक करून नियुक्त पथकाने प्रत्यक्ष कारखाना स्थळी जाऊन ऊस वजन काट्यांची तपासणी करण्याचे निर्देश दिले जातात. गाळप हंगाम २०२५-२६ साठी कारखान्याचे वजन काटे वैधमापन शास्त्र निरिक्षक विभाग गेवराई,बीड यांचे मार्फत नोव्हेंबर २०२५ मध्ये वजन काटा/वजन मापेपडताळणी करून मुद्रांकन केलेले आहेत. त्यानतंर दीं.१६ जानेवारी २०२६ रोजी लोकनेते सुंदर रावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या वजन काट्यांची विशेष भरारी पथकाने अचानकपणे कारखान्यास भेट देऊन प्रत्यक्ष वजन काट्यांची तपासणी केली. वजन काटा तपासणीचे पथकामध्ये श्री जी.बी. मिसाळ निरीक्षक वैद्यमापन शास्त्र गेवराई,श्री व्ही.एम.चित्तलवाड निरीक्षक वैद्यमापन शास्त्र पाटोदा ,श्री जी .एम. कांबळे उपनियंत्रक वैद् मापन शास्त्र बीड ,श्री डी. एल .शिंदे निरीक्षक वैद्य मापन शास्त्र परळी , श्री एस .ए .सोळंके निरीक्षक वैद्धमापनशास्त्र बीड यांचा समावेश होता. या पथकाने ऊस उत्पादक शेतकरी आणि कारखान्याचे अधिकारी यांचे समक्ष प्रत्यक्ष उसाने भरलेली वाहने ,बैलगाडी कारखान्याचे वजन काट्यावर फेरपडताळणीस घेऊन वजनाची तपासणी केली असता कारखान्याचे सर्व वजन मापे ▶▶ उर्वरित पान २ वर

# टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकच्या यशाची परंपरा कायम

## हिवाळी परीक्षेत विद्यार्थ्यांचे घवघवीत यश ; निकालात मुलींची बाजी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



येथील श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या टी.बी. गिरवलकर पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने घेतलेल्या हिवाळी परीक्षा - २०२५ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी लक्षवेधी गुण मिळवून संस्थेच्या उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे तृतीय वर्ष शाखा - संगणक अभियांत्रिकीचे विद्यार्थी क्षितीजा आत्माराम आगळे - ९७.२९ टक्के (प्रथम), वैभवी हरिकीशन रांदड - ९७.०६ टक्के (द्वितीय), समाधान अर्जुन छत्रे - ९६.५९ टक्के (तृतीय), द्वितीय वर्ष शाखा - संगणक अभियांत्रिकीचे विद्यार्थी शुभ्रा

# बीड ही साधुसंत महात्म्यांची भूमी आहे: ह. भ. प. योगीराज महाराज गोसावी

## गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुप्रेमातून एकवटले असंख्य भाविक

**बीड । प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायाचा पाया रचनेची प्रेरणा संत निवृत्तीनाथ महाराजांना ज्यांनी करून दिली ते गहिनीनाथ महाराज यांचा गहिनीनाथ गड या बीडच्या भूमीत आहे नाथ नातं संप्रदायाचा पाया ज्यांनी घातला ते मच्छिंद्रनाथ यांची संजीवन समाधी , जालिंदर नाथांची समाधी याच भूमीत आहे,संतश्रेष्ठ नगद नारायण महाराज, बंकट स्वामी महाराज , संत मन्मथ स्वामी महाराज, सुफी संत शहेनशहावली महाराज,संत वामनभाऊ महाराज ,संत भगवान बाबा ,संत माऊली दादा चाकरवाडीकर ,संत किसन बाबा व शांती ब्रह्म संत नवनाथ बाबा महाराज बीड हि संत महात्म्यांची भूमी आहेअसे श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये ह भ प योगीराज महाराज गोसावी यांनी विवेचनात म्हटले . एखाद बीज स्वतः ला जमिनीत गाढून घेत तेव्हा त्याचा वटवृक्ष होतो तस गुरुवर्य किसन बाबा महाराज व गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी गोरक्षनाथ टेकडी साठी संपूर्ण आयुष्य समर्पित केलं , आयुष्य वेचलं म्हणून आज हा श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी चा वटवृक्ष झाल्याचा दिसून येतो मनुष्याचा नेहमी बोलण्यावर ताबा असावा अनेक उपद्रव तुमच्या बोलण्याने होतात त्या पेक्षा न बोललेलं बरं म्हणून माणसाचा बोलण्यावर नियंत्रण असावे शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज हे आदर्श समोर ठेवून माणसाने बाबांप्रमाणे कमी बोलावं कमी बोलण्याने मन शांत राहते माणसाने मान अपमान याच्या पुढे



जावे एखाद्याने मान दिला जास्त हाळूऊन जाऊ नये व एखाद्याने अपमान केला तर दुःख करून जो व्यक्ती मान अपमानाचा समान लेख तोच सुखी होतो असे अभंग विवेचन करताना ह भ प योगीराज महाराज गोसावी यांनी केले. यावेळी कीर्तन सेवेत किर्तन साथ गायनाचार्य वादन साथ मृदंगाचार्य टाळकरी माळकरी विणेकरी भजनी मंडळी यांच्या समवेत असंख्य भाविक भक्त श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे कीर्तन सेवेस उपस्थित होते.